# एकविसाव्या शतकातील ग्रामीण कादंबरी

डॉ. पवन मांडवकर
प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१
अध्यक्ष, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
E mail: pavanmandavkar@hotmail.com भ्रमणध्वनी ९४२२८६७६५८

**गोषवारा**

एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी मराठी ग्रामीण कादंबरीतील प्रयोगशीलतेच्या पार्श्वभूमीवर काही साहित्यकृतींची दखल घेणे क्रमप्राप्त आहे. इ.स. २००० नंतरच्या ग्रामीण आणि समस्थिती वर्णनाच्या कादंबरीचा विचार करताना बाबाराव मुसळे यांची 'वारुळ', प्रतिमा इंगोले यांची 'पार्ट टाईम', आशा बगे यांची 'भूमी', रवींद्र शोभणे यांची 'पांढर', नवनीत देशमुख यांची 'अंगणवाडी', अशोक पवारांची 'दर कोस दर मुक्काम', सदानंद देशमुखांची 'चारीमेरा' या कादंबऱ्यांचा समावेश उल्लेखनीय कादंबऱ्यांमध्ये करता येईल.

रमेश इंगळे उत्रादकर यांची 'निशाणी डावा अंगठा' व 'सर्व प्रश्न अनिवार्य', श्रीकांत बोजेवार यांची 'पावणेदोन पायांचा माणूस', दिनकर दाभाडे यांची 'व्हाया सावरगाव खुर्द', सुशील धसकटे यांची 'जोहार' अशा काही कादंबऱ्यांनी पारंपारिक आशय आणि आविष्कार मूल्यांना समांतर अशा नवनव्या पायवाटेवरून वाटचाल करीत मराठी कादंबरीच्या कक्षा रुंदावत नेल्या. पारंपरिक चौकटीतून बाहेर येत ग्रामीण जीवनवर्णनात नवनवीन भाषिक रूपेही पुढे आली. वास्तवाकडे ही कादंबरी झुकणारी असली तरी कल्पनाविलासही तिच्यात आहे. ही एकविसाव्या शतकाची सुरुवात असल्याने पुढे ग्रामीण कादंबरी आणखी प्रगत होईल, अशी आशा करायला हरतत नाही.

**बीजशब्द :**

ग्रामीण कादंबरी, नव्वदोत्तर, जागतिकीकरण, आशयद्रव्य, विषयनावीन्य, वास्तव

**प्रस्तावना**

एकविसाव्या शतकात जागतिकीकरण, उदारीकरण आणि आधुनिकीकरणावर जोर दिला गेला. साहित्य, भाषा, संस्कृती अशा विविध क्षेत्रांमध्ये परिवर्तने झाली. नव्वदनंतर आणि एकविसाव्या शतकामधील मराठी ग्रामीण कादंबरी जागतिक स्तरावरील कादंबरीच्या दर्जापर्यंत पोहोचू शकलेली नाही. तिच्यामध्ये प्रयोग झाले नाहीत, अशातला भाग नाही; परंतु जो दर्जा मिळावयास हवा होता तो मात्र तिला अद्यापपर्यंत प्राप्त करता आलेला नाही.

प्रादेशिक कादंबरी आणि ग्रामीण कादंबरी यांच्यातील सीमारेषा धूसर असल्या तरी हे दोन्ही प्रकार वेगळे आहेत. प्रादेशिक कादंबरीने काही वैशिष्ट्यपूर्ण अशा वेगळ्या अंगाने स्वत:चे अस्तित्व प्रखर केले, तरीपण पुष्कळदा अनेक प्रादेशिक कादंबऱ्यांची गणना ग्रामीण कादंबऱ्यांमध्ये केली गेल्याचे जाणवते.

नव्वदनंतर आणि पुढे एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी मराठी ग्रामीण कादंबरीतील प्रयोगशीलतेच्या पार्श्वभूमीवर काही साहित्यकृतींची दखल घेणे क्रमप्राप्त आहे.

**विषय विवेचन**

मराठी ग्रामीण कादंबरीच्या आशयाच्या नव्यानव्या बदलत्या पायवाटा नव्वदनंतर आपल्याला बघायला मिळतात. नव्वदनंतर आणि एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी ग्रामीण जीवनात खूप बदल झाले आहेत. नवे प्रश्न निर्माण झाले आहेत. साहजिकच ग्रामीण कादंबरीही नव्या आत्मभानाची आहे. ग्रामीण जीवनातील संघर्ष अधिक कठीण आणि जीवघेणा झाल्याचे जाणवते. या काळात किंवा आजच्या घडीला विलास अंभोरे, कैलास दौंड, अशोक कौतिक कोळी, महेश मोरे प्रदीप धोंडिबा पाटील, अनुराधा गुरव, वैशाली कोल्हे, उज्ज्वला शिंदे, मेघा पाटील, शुभदा मुंजे, अनुराधा वैद्य, संपत जाधव अशी काही नवीन पिढीतील मंडळी काही जुन्या पारंपारिक अंगाने तर काही नव्या आशयाच्या अंगाने कादंबरी क्षेत्रात पुढे आल्याचे आपल्याला दिसते.

१९९१ मधील विश्वास पाटलांची 'झाडाझडती', १९९२ मधील रवींद्र शोभणे यांची 'कोंडी', १९९४ मधील दिनकर दाभाडे यांची 'बिलामत', १९९५ मधील बाबा भांड यांची 'दशक्रिया', १९९५ मधील बाबाराव मुसळे यांची 'पखाल', १९९८ मधील सदानंद देशमुख यांची 'तहान', १९९९ मधील प्रतिमा इंगोले यांची 'बुढाई', २००० मधील सदानंद देशमुख यांची 'बारोमास' या काही नव्वदोत्तर २००० पर्यंतच्या कालावधीतील उल्लेखनीय कादंबऱ्या म्हणता येतील. या कादंबऱ्यांमधून समकालीन कृषी व्यवस्थेचा वेध दिसून येतो, त्याचप्रमाणे शोषणाविरुद्ध बंडखोरी आणि स्वाभिमानी नायक—नायिकांची पेरणी दिसते. समाजात काही नवी मूल्ये रुजविण्याचा प्रयत्नही या कादंबऱ्यांतून झाल्याचे आपल्याला दिसते.

१९९९ मधील रमेश अंधारे यांची 'पागोरा', १९९७ मधील राजन गवस यांची 'तणकट', २००१ मधील किशोर सानप यांची 'हारास' या कादंबऱ्या भाषिक बोलींच्या प्रयोगामुळेही उल्लेखनीय ठरतात.

२००० नंतरच्या अर्थात एकविसाव्या शतकातील ग्रामीण आणि समस्थिती वर्णनाच्या कादंबरीचा विचार करताना बाबाराव मुसळे यांची २००४ मधील 'वारुळ', २००२ मधील प्रतिमा इंगोले यांची 'पार्ट टाईम', २००४ मधील आशा बगे यांची 'भूमी', २००८ मधील रवींद्र शोभणे यांची 'पांढर', २००९ मधील नवनीत देशमुख यांची 'अंगणवाडी', २०१० मधील अशोक पवारांची 'दर कोस दर मुक्काम', २०१६ मधील सदानंद देशमुखांची 'चारीमेरा' या कादंबऱ्यांचा समावेश उल्लेखनीय कादंबऱ्यांमध्ये करता येईल.

२००५ मध्ये रमेश इंगळे उत्रादकर यांची 'निशाणी डावा अंगठा' तसेच २०११ मधील 'सर्व प्रश्न अनिवार्य', २००७ मधील गणेश आवटे यांची 'भिरूड', त्यानंतर २०१० मधील भालचंद्र नेमाडे यांची 'हिंदू जगण्याची समृद्ध अडगळ', २०१८ मधील नवनाथ गोरे यांची 'फेसाटी', २०१९ मधील रंगनाथ पठारे यांची 'सातपाटील कुलवृत्तांत' या कादंबऱ्यांनी पारंपारिक आशय आणि आविष्कार मूल्यांना समांतर अशा नवनव्या पायवाटेवरून वाटचाल करीत मराठी कादंबरीच्या कक्षा रुंदावत नेल्या.

**एकविसाव्या शतकातील निवडक कादंबऱ्यांची वैशिष्ट्ये**

**रमेश इंगळे उत्रादकर यांच्या दोन कादंबऱ्या**

'निशाणी डावा अंगठा' या २००५ मधील कादंबरीने मराठी कादंबरीला नवे भान दिले. जागतिकीकरणाच्या प्रवाहात दर्जेदार शिक्षणाचे केवळ कागदावरचे नियोजन हे शिक्षण व्यवस्थेला कोणत्या पातळीवर घेऊन जाते, हे आपल्याला या कादंबरीतून दिसते. पुढे २०११ मधील 'सर्व प्रश्न अनिवार्य' या कादंबरीतून रमेश इंगळे उत्रादकर यांनी शिक्षण क्षेत्राशी निगडित विविध बाबी मांडलेल्या आहेत.

सर्व शिक्षा अभियानातल्या शिक्षक, अधिकारी, विद्यार्थी, शिक्षणाधिकारी अशा सर्वांशी संबंधित असलेलं एक साखळीनाट्य लेखकाने 'निशाणी डावा अंगठा'या कादंबरीतून मांडले आहे. याच कादंबरीवर पुढे चित्रपटही प्रदर्शित झाला.

'सर्व प्रश्न अनिवार्य' या कादंबरीची सहिता प्रश्नपत्रिकेसारखी संमिश्र आहे. बरेचदा विद्यार्थ्यांना अनावश्यक प्रश्नच विचारले जातात, महत्वाचे प्रश्न विचारले जातच नाहीत. प्रश्नपत्रिका कुणीही काढली तरी ती शिक्षण क्षेत्रासाठी चिंता करायला लावणारी बाब असते, हे सांगताना लेखकाने अत्यंत ताकतीने शिक्षण व्यवस्थेवरील भाष्य केले आहे. नैतिक, मौलिक अनुभवसिद्ध सामाजिक असा हा दस्तऐवज आहे.

**श्रीकांत बोजेवार यांची 'पावणेदोन पायांचा माणूस'**

२००७ मध्ये श्रीकांत बोजेवार यांची एक आगळीवेगळी कादंबरी आली — 'पावणेदोन पायांचा माणूस'. वास्तविक श्रीकांत बोजेवार हे एक पत्रकार आहेत. लेखनातील नैतिकता मानणारे, मराठीतील सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणारे हे लेखक आहेत.

कादंबरीची अर्पणपत्रिका अशी आहे —

'मानवनिर्मित संगणकाची सिस्टीमसुद्धा जिथे करप्ट होते, तिथे स्वेच्छेने नॉन करप्ट राहण्यासाठी प्रामाणिकपणे धडपडणाऱ्या प्रत्येक माणसाला.....'

अर्पणपत्रिकेवरूनच लेखकाची मानसिक जडणघडण आणि कादंबरीतील विचारवैभवाची कल्पना येते. मानवापेक्षा चार पायांवर जगणारे मांजरबोके लेखकाला अधिक प्रामाणिक वाटतात. संपूर्ण मानवी व्यवस्था भ्रष्ट झाल्याचे शल्य लेखकाला अस्वस्थ करते. 'पावणेदोन पायांचा लंगड्या पितांबर' व्यवस्थाशरण माणूस असा उल्लेख ते करतात. जगताना अनैतिक तडजोडी करणारा, भौतिक इहवादी जगातल्या गफलतींचा—बुद्धिभेदांचा भौतिक फायदा करून घेणारा ॲण्टीहिरो येथे लेखकाने दर्शविला आहे. तो एका पायाने अधू आहे; परंतु पावणे दोन पायांच्या आपल्या करामतीवर तो आपल्या कुटुंबांचं जगणं सुकर करतो. 'माणूस आतल्या पशुत्वाला खतपाणी घालून मांजरासारखे डोळे बंद करून जगातलं दुधाचं पातेलं फस्त करीत असतो. हे दूध आपलं नसलं तरी आपलं समजून प्राशन करण्याची जीवन कला ही साधायला हवी. पितांबरी मांजर पावणे दोन पायांचं मांजर असलं तरी ते जगणं सुंदर सुखवस्तू करण्यासाठीच; धडधाकट पायांच्या माणसांवर ताण करीत जगतं.'[१] धडधाकट माणसं वरवर धडधाकट दिसत असली तरी आतून ती अधू असतात, पतित असतात हे लेखकाला दाखवायचं आहे. लेखकावर तंबी दुराई यांच्या शैलीचा प्रभाव दिसून येतो. ही कादंबरी फॅन्टसी आणि वास्तवाचे अद्‌भुत मिश्रण आहे. अज्ञात प्रेरणांचा आणि उत्प्रेरकांचा शोध लेखकाने या कादंबरीतून घेतलेला आहे. लंगड्या पितांबराचे जगणे हेच आजच्या माणसाचे जगणे बनले आहे, असे लेखकाने पटवून दिले आहे.

**दिनकर दाभाडे यांची 'व्हाया सावरगाव खुर्द'**

२०१६ मध्ये प्रकाशित झालेली दिनकर दाभाडे यांची 'व्हाया सावरगाव खुर्द' ही एक प्रदीर्घ कादंबरी आहे. या कादंबरीतील गावगाड्यात कुठलीच मूल्यनिष्ठा शिल्लक राहिल्याचे दिसत नाही. एकीकडे लेखकाने राजकारण ही अत्यंत चांगली आणि शुद्ध गोष्ट असल्याची भूमिका मांडली आहे तर दुसरीकडे पात्रांच्या माध्यमातून राजकारण ही चांगली आणि शुद्ध गोष्ट नाही, शोषण आणि पदलालसा सोबतच सत्तासंपत्तीचे केंद्रिकरण हेच राजकारणाचे अंतिम उद्दिष्ट बनल्याचेही मान्य केले आहे. ग्रामपातळीवरील विकृत राजकारणाचे स्वरूप व्यक्त करताना लेखकाने तपशीलविस्ताराचा मोह टाळला असता तर अधिक योग्य झाले असते. असे असले तरीदेखील संवेदनशील वाचकाला ही कादंबरी भुरळ पाडते, अस्वस्थ करते.

**सुशील धसकटे यांची 'जोहार'**

२०१५ मध्ये प्रकाशित सुशील धसकटे यांची 'जोहार' ही कादंबरी आशय आणि विषयाभिव्यक्तीच्या नावीन्याने प्रकाशात आली. सद्यस्थितीवर भाष्य करणारा परंतु एक पराभूत आणि विमनस्क मानसिकतेत गेलेला नायक या कादंबरीत दिसतो. तो मराठी तरुणांना आकर्षक वाटतो. महाराष्ट्रातील बहुजन तरुणांच्या हृदयाचा ठाव घेण्याचा प्रयत्न येथे दिसतो. लेखकाने गांधीचिंतनही या कादंबरीच्या माध्यमातून मांडले आहे. या कादंबरीला मिळालेला आशयाचा भरीवपणा हेदेखील एक वैशिष्ट्य आहे. ग्रामीण समाजातील प्रश्न मांडणारी ही कादंबरी निश्चितच दखलपात्र आहे.

**अन्य उल्लेखनीय कादंबऱ्या**

एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी मराठी ग्रामीण कादंबरीने नवनवीन प्रयोग केलेले आहेत. कितीतरी कादंबऱ्या उल्लेख करण्याजोग्या आहेत. २००५ मधील दिलीप भावसार यांची 'जिताड', २००८ मधील अशोक पवार यांची 'इळनमाळ', २०११ मधील आनंद विंगकर यांची 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट', २०१२ मधील राजन गवस यांची 'ब—बळीचा', २०१३ मधील अशोक पवार यांची 'तसव्या', २०१८ मधील नवनाथ गोरे यांची 'फेसाटी', २०२० मधील अविनाश कोल्हे यांची 'पंगतीतलं पान' अशा काही कादंबऱ्यांनी वेगवेगळे प्रयोग मराठी ग्रामीण कादंबरीविश्वाला सादर केले आहेत. नवा आकृतिबंध, विषयनावीन्य, वास्तवाला सामोरे जाण्याकडे कल, पारंपरिक साच्याला समांतर नवा रूपबंध ही काही वैशिष्ट्ये नमूद केली पाहिजेत. 'लघुकथेसारखा स्फुट प्रकारच हाताळण्याच्या अनुकरणात अजून नवा ग्रामीण साहित्यिक अडकलेला आहे.'[२] हे आनंद यादवांचे म्हणणे आता ग्रामीण कादंबरीला लागू होत नाही, हे तितकेच खरे!

**समारोपीय निष्कर्ष**

नव्वदोत्तर आणि एकविसाव्या शतकातील ग्रामीण कादंबरीचा अभ्यास करताना जाणवते की नवनवीन विषय, आशय नव्या दमाच्या आणि काही जुन्या कादंबरीकारांनी हाताळले आहेत. पारंपरिक चौकटीतून बाहेर येत ग्रामीण जीवनवर्णनात नवनवीन भाषिक रूपेही पुढे आलेली आहेत. 'कादंबरीतून अभिव्यक्त होणारे आशयद्रव्य विशिष्ट समाजजीवनातून येते. ते ज्या समाजजीवनातून घेतले जाते, त्या समाजाची भाषाही आशयद्रव्याबरोबर कादंबरीत येते.'[३] या न्यायाने विविधांगी वैशिष्ट्यांनी परिपूर्ण समाज आणि बोलीभाषाही पुढे आलेल्या आहेत. वास्तवाकडे अधिक कल असणाऱ्या कादंबऱ्या या काळात निर्माण झाल्या. असे असले तरी कल्पनाविलासाचा अभाव मुळीच नाही. कल्पनांची झेप अधिक व्यापक होत असताना अद्‌भुताकडेही लेखणी वळल्याचे क्वचित जाणवते. ग्रामीण जीवनातील आव्हाने बदलली आहेत. नवनव्या भीषण अशा समस्यांना सामोरे जाण्याच्या नवनव्या पद्धतींना ग्रामीण कादंबरीने काळजाला भिडेल, असे रेखाटले आहे. काहीवेळा अधिक पाल्हाळ आणि अनावश्यक विस्तारही दिसून येतो. मात्र ही एकविसाव्या शतकाची सुरुवात असल्याने पुढे ग्रामीण कादंबरी आणखी नवनव्या वाटा चोखाळेल आणि नव्या वळणांवरील प्रवासात संरचनात्मक भरीव कामगिरी केल्याशिवाय राहणार नाही.

**संदर्भ**

१. सानप, डॉ. किशोर, 'नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी : आविष्कार तंत्रे आणि शैली', नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी, संपा. डॉ. गजानन जाधव, अनघादित्य प्रकाशन, परतवाडा, प्रथमावृत्ती, १५ ऑक्टोबर २०२१, पृ. ६५

२. यादव, आनंद, 'ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८१, पृ. ५३

३. मोरे, नंदकुमार, समाजभाषाविज्ञान आणि मराठी कादंबरी, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०१२, पृत्र ८३

**संदर्भ ग्रंथ**

१. काळुंखे, रामचंद्र (संपा.), ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २०१८

२. नलगे, प्रा. चंद्रकुमार (संपा.), ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, शैलेंद्र प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९६

३. मांडवकर, डॉ. पवन (संपा.), दलित ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्य, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र, कळंब, प्रथमावृत्ती, २०१४